HAPPY Diwali

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०१ ● अंक : ३५३ ● पुणे ● शनिवार, दि. ०२ नोव्हेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

## सुट्टीची सुचना

आज शनिवार, दि. ०२ नोव्हेंबर २०२४ व रविवार, दि. ०३ नोव्हेंबर २०२४ रोजी *दिपावली निमित्त* दै. आरंभपर्व कार्यालयाला सुट्टी असल्याने ०३ नोव्हेंबर व ०४ नोव्हेंबर रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. दि. ०५ नोव्हेंबर २०२४ पासून अंक नियमितपणे सुरू राहिल. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.

**- संपादिका**

## ठळक बातम्या

### तुळजाभवानी मंदिर उजळले

**धाराशिव : (आरंभ पर्व)** : केळीच्या बुंधाला पेटवलेला आगीचा लोळ, आई राजा उदो-उदोच्या गगनभेदी घोषणा, संबळाचा कडकडाट, अशा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात काळभैरवनाथाने कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. वर्षातून एकदा दिवाळीच्या काळात होणाऱ्या या चित्तथरारक भेंडोळी उत्सवाने तुळजाभवानी देवी मंदिराचा गाभारा उजळून निघाला होता. यावेळी भाविकांचीही मोठी गर्दी होती. दिवाळीत नरकचतुर्दशींच्या दिवशी कुलस्वामिनी तुळजाभवानी मंदिरात गुरूवारी काळभैरव भेंडोळी उत्सव साजरा करण्यात आला.

# दिवाळीनिमित्त बारामतीत पवार कुटुंब एकत्र दिसणार का?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"अधिकृत उमेदवार व्यतिरिक्त राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, त्यांना मी सांगेल तो निर्णय घ्यावा लागेल " असं स्पष्ट शब्दात अजित पवारांनी बंडखोरांना ताकीद दिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. अजित पवारांनी काही मिनिटं बंडखोर नाना काटे यांची भेट घेऊन चर्चा केली आहे.

मावळमध्येही तिढा निर्माण झाला आहे.याबद्दल काल चर्चा झाली आहे. अशा ठिकाणी सामंजस्य भूमिका घ्यावी लागेल.उमेदवाराने ऐकलं नाही तर काही कठोर निर्णय घेणार असं अजित पवार यांनी सांगितलं. शिवतारे यांच्या बाबत प्रश्न विचारला असता "मी महायुतीचा जबाबदार व्यक्ती आहे. प्रत्येकाच्या बद्दल बोलणार नाही. 20 तारखेपर्यंत एकोपा ठेवायचा आहे. यावर मी उत्तर देणार नाही " असं अजित पवार म्हणाले.

दरम्यान दिवाळीनिमित्त बारामतीत पवार कुटुंब एकत्र दिसणार का? या प्रश्नावर मोघम उत्तर अजित पवारांनी दिलं. "आपल्याला दिसेल " अशा दोन शब्दात उत्तर देत अजित पवारांनी प्रसार माध्यमांशी संवाद आटोपता घेतला.



## सद्सद्विवेकबुद्धीला वाटले, ते बोललो

'कथित सिंचन घोटाळ्याच्या चौकशीच्या नस्तीवर (फाइल) तत्कालीन गृहमंत्री दिवंगत आर. आर. पाटील यांनी स्वाक्षरी करून केसाने गळा कापल्याच्या विधानाचा निवडणुकीशी काही संबंध नाही. माझ्या दृष्टीने तो विषय संपला आहे. माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला जे वाटले, ते मी बोललो,' असे राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी चिंचवडमध्ये स्पष्ट केले. 'केवळ मला बदनाम करण्यासाठी ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले. पुढे चौकशीसाठी एक नस्ती तयार केली गेली. ती गृह खात्याकडे गेल्यानंतर आर. आर. पाटील यांनी माझी खुली चौकशी करावी, म्हणून स्वाक्षरी केली. त्यांनी केसाने गळा कापण्याचे काम केले,' असे विधान अजित पवार यांनी तासगावमध्ये केले होते. त्याचे राजकीय पडसाद उमटले. त्यावर अजित पवार यांना विचारले असता, ते म्हणाले, 'जे झाले ते झाले. ते परत उकरून काढायचे नाही. माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला जे वाटले, ते मी बोललो. याचा निवडणुकीशी काही संबंध नाही. माझ्या दृष्टीने तो विषय संपला आहे. आगामी महापालिका निवडणुका पूर्ण ताकदीने लढणार आहोत. पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीला यश मिळण्यासाठी मी पुढाकार घेणार आहे. हे शहर २५ वर्षे आमच्या विचारांबरोबर ठेवले होते. शहराचा कायापालट करण्याचा प्रयत्न केला.

Jivraj Chole
9767789529
uchitmadhyam@gmail.com
www.uchitmedia.in
@uchitmedianews
@uchitmedia

UCHIT MEDIA
PR & ADVERTISING
Services to noble cause

MEDIA CONSULTANCY | PUBLIC RELATION
ADVERTISING | MEDIA STRATEGY

SERVICES
✓ Press Note ✓ Print & TV
✓ Press Conference ✓ Social Media
✓ Political PR ✓ Documentary
✓ Content Development ✓ Photography
✓ Corporate Communications ✓ News Tracking & Documentation

सर्जनशील NEWS चला मने उलगडूया
OUR NEWS PLATFORM
सर्जनशील कट्टा चला... मने उलगडूया

Address: Flat 3, First Floor, Vishnu Narhar Apartment, 1468 Sadashiv Peth, Tilak Road, Pune-411030

यंदाची दिवाळी, विश्वासाची दिवाळी, भरवशाची दिवाळी

भारताच्या काना-कोपऱ्यात खात्रीशीर प्रसिद्धी आणि प्रसार करायचा असेल तर हक्काचे नाव म्हणजे **महाराष्ट्र मीडिया सर्व्हिसेस.** आपल्याला हवे तेव्हा आपला सर्वदूर पोचेल, याची हमी देणारा एकमेव विश्वसनीय ब्रँड. चला, आव्हानांचे रूपांतर संधीत करूया आणि एकत्र येऊन उज्वल भवितव्य घडवूया.

शुभ दीपावली
आपणांस दिवाळीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा...!

ठळक वैशिष्ट्ये
भारतातील ग्रामीण भागापर्यंत नेटवर्क असलेली विश्वसनीय पीआर कंपनी
संपूर्ण भारतात पार्टनर नेटवर्क
२०० पेक्षा अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ब्रँड्स बरोबर केले काम
आजवर विविध उद्योगांमध्ये १५० पेक्षा अधिक यशस्वी अभियान

MAHARASHTRA
MEDIA SERVICES & PUBLIC RELATIONS PVT.LTD.

**Address:** Office No. 104-106, Mandke Business Centre, 1st Floor, 652, Narayan Peth, Appa Balwant Chowk, Pune - 411030. Maharashtra.
**Contact:** +91 98225 27727 / 99234 08400
**Email:** raju.nikam@maharashtramedia.in

Estd. 1999 | Suryadatta Education Foundation's
SURYADATTA® GROUP OF INSTITUTES, PUNE
ISO 9001 : 2015 Certified Institutes and Accredited by ANAB, USA (Member of IAF) by NVT-QC
SURYADATTA Enriching Career and Enhancing Lives Since 1999
SURYADATTA Enabling Holistic and Sustainable Development Since 1999

TRUSTED NAME FOR QUALITY EDUCATION FOR HOLISTIC & SUSTAINABLE GROWTH
New Look of our Modern & Unique Enriching Enlightening Academic Ambience of Suryadatta Bavdhan Campus @ 2025
Ranked in Top 50 Group of Institution in India for 24 consecutive years by leading National Surveys
SURYADATTA Celebrating 25 Rajat Mahotsav Enriching Careers & Enhancing Lives !
Wishing you a very Happy & Prosperous Diwali

Maharashtra Government Approved & University Affiliated Diploma, Adv. Diploma & Degree Program

CBSE School www.suryadattaschool.org
- Nursery to Std. XII
8956932413, 9112297608, 9763266829

JUNIOR COLLEGE XI & XII
- Arts - Commerce - Science
- I.T. - Bifocal - MCVC
8956943822, 8669602051, 8956932400 9112297604, 7262011775, 9763266829
www.sjcpune.org / www.spspune.org

ARTS www.scmirt.org
- Bachelor of Arts (BA) - Psychology / German / Economics / English / Journalism / Geography / Political Science / Public Administration
- MA Economics / English / Psychology
- M.A. Journalism & Mass Communication
- M.Sc. Media & Communication Studies
8956932419, 8956932402, 9763266829

COMMERCE www.scmirt.org
- B.Com - Bachelor in Commerce
- M.Com - Master in Commerce
8378998127, 8956932402, 8956932400

IT / COMPUTER SCIENCE / DATA SCIENCE
- B.Sc. Computer Science (B.Sc. CS) www.scmirt.org
- B.Sc. Animation
- B.Sc. MGA (Media Graphics & Animation)
- B.Sc. Information Technology (B.Sc. IT)
- B.Sc. Data Science*
- B.Sc. Computer Application*
- B.Sc. AI & Machine Learning*
- M.Sc. Computer Science
- M.Sc. Computer Application - M.Sc. Data Science
- M.Sc. Mathematics - M.Sc. Statistics
- M.Sc. Bioinformatics*

AICTE Approved : www.simmc.org / www.sibmt.org
- Bachelor of Computer Application (BCA)
- Master of Computer Application (MCA)
SIMMC DTE Code : MC654724110 | SIBMT DTE Code : MC654824110
8956932419, 8956932402, 8956932400

LAW www.sgislc.org
- B.A. LL.B. (5 yrs) CHOICE CODE : 2602710712
- Diploma in Cyber law
- Diploma in Labour & Labour Welfare
- Diploma in Taxation Laws*
- Diploma in Intellectual Property Rights Laws*
- BBA LLB* (5 yrs) - LLB* (3 yrs) - LLM*
- Certificate course in forensic & Medical Jurisprudence
9371096506, 8956932402, 9763266829

CYBER & DIGITAL SCIENCE www.siics.org
- B.Sc. Cyber & Digital Science
- B.Sc. Cyber Security*
- M.Sc. Cyber Security*
8378998126, 8956932402, 8956932400

HOTEL MANAGEMENT www.schmtt.org
- B.Sc. H.S. (Hospitality Studies)
- Dip.& Adv. Dip. in Hospitality Studies
- M.Sc. Hospitality Studies
- B.Sc. Home Science
8956932408, 8956938603, 8956932400

HEALTH SCIENCE
PHYSIOTHERAPY www.sgisihs.org
MAHA CET College Code 06177
- Bachelor of Physiotherapy (B.P.Th.)
7262011338, 7262011774, 9763266829

PHARMACY DTE College Code : 6989 www.scphr.org
- Diploma in Pharmacy
- Bachelor of Pharmacy
7262011339, 9763266829, 8956932400

NURSING & PARAMEDICAL SCIENCE www.scnpst.org
- ANM - GNM
7262011774, 7776072000, 9763266829

EVENT MANAGEMENT www.simcem.org
- Dip.& Adv. Dip. in Event Management
8956932415, 8378998124, 8956932400

DESIGN www.sgisift.org | www.sgipiat.org www.sgisivas.org
- B.Sc.- Fashion Design
- Dip. in Interior Design & Decoration
- Dip. & Adv. Dip. in Interior Design
- Dip. & Adv. Dip. in Fashion Design
- Diploma in Fashion Technology
8956932405, 8956932416, 8956932400

AICTE Approved
BUSINESS MANAGEMENT www.simmc.org www.sibmt.org
- Bachelor of Business Administration (BBA)
SIMMC College Code : 0654710110 | SIBMT College Code : 0654810110
8956932419, 8956932402, 8956932400

- MBA Specialization
- Marketing - Finance
- Human Resource - Operations & Supply Chain
- Business Analytics - Pharma & Health Care
- Rural & Agri Business
SIMMC DTE Code : MB654710110 | SIBMT DTE Code : MB654810110
8956932418, 7262011114, 9763266829

- PG Diploma in Taxation www.scmirt.org

Post Graduate Management Programme (PGDM) www.simmcpgdm.org
(Dual Specialization)
with Value Added Certification
- Marketing - International Business
- Finance - Agri Business Management
- Human Resource - Tourism & Hospitality Management
- Operations - Pharma & Healthcare Management
8956932418, 7262011114, 8956932400

PH.D. IN MANAGEMENT www.simmc.org / www.sibmt.org
- Ph. D. in Management (Doctoral Research)
9112297607, 8956932400, 9763266829

- Suryadatta International Institute of Liberal Arts
- Suryadatta Global Finishing School
9763266829, 9881490036
*Subject to approval from A.Y. 2025- 2026

Advantages at Suryadatta
- Shaping Professionals for Global Market Place
- Extensive Industry Institute Interface
- Enriching Students through round the year minimum 5 Value Added Certification per year
- Yoga, Health Fitness Activities
- Hostel & Bank Loan Facilities
- Study Tour Abroad (Optional)
- Guest Lectures & Foundation Classes for competitive exams such as : UPSC, MPSC, CA, CS, ICWA, NDA etc.
- Soft Skills & Personality Development Sessions
- Round the year value addition leading to Nation Building
- Multidisciplinary Integrated Campus offering Courses in Emerging Sector - NEP complied
- Live Projects & Placement Assistance
- Field Work, NGO Projects & Research Assignment
- Live Food Festivals & Interior Design Expo & Fashion Show
- Business Communication & Foreign Languages
- Indoor & Outdoor Sports Activities
.....& many more

Multi Disciplinary Integrated Campuses @ Different Locations in Pune & Offices in India & Abroad
Career Guidance Message your Name, City, Course : 8956932400 / 9763266829
Follow us on www.suryadatta.org
For details Scan QR Code

Suryadatta - Enriching Careers & Enhancing Lives for Enabling Sustainable Development Since 1999



# विकासकामे बोलकी ठरणार?

लोकसभा निवडणुकांमध्ये महायुती आणि महाविकास आघाडीला मिळालेल्या मतांमध्ये अवघ्या अर्ध्या टक्क्यांचा फरक आहे. लाडकी बहीण योजनेमुळे महायुती सरकार महिला मतदारांना जिंकू शकेल. खेरीज सोयाबीन, तांदूळ, धान आदी पिकांचे राहिलेले पैसे दिले गेले आहेत. मुंबई-पुण्यामध्ये मेट्रो जाळे विस्तारणे, कोस्टल रोड, अटल सेतू, टोल हटवले जाणे आदी निर्णयांमुळे ही निवडणूक महायुती आपल्या बाजूने झुकवू शकेल. महाराष्ट्रात निवडणुकीचे रण चांगलेच तापले आहेत. एव्हाना सर्व पक्षांचे उमेदवार निश्चित होत आले आहेत. लवकरच प्रचाराची जोरदार रणधुमाळी अनुभवायला मिळेल. 23 नोव्हेंबर 2019 रोजी फडणवीस आणि अजित पवार यांच्या सरकारचा शपथविधी झाला होता आणि त्याच दिवसापासून महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळजनक घटनांची मालिका सुरू झाली होती, जी आजपावेतो सुरूच आहे. भाजपाबरोबर युती करून निवडणूक लढवणारी शिवसेना निकालानंतर ताबडतोब शरद पवार आणि काँग्रेसबरोबर गेली आणि महाविकास आघाडी स्थापन झाली. त्यावेळी शिवसेनेचे 56 आमदार होते तर शरद पवारांचे 54 होते. दोन आमदार जास्त असल्याच्या बळावर उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपद मिळाले. राज्यातील मोठा, अधिक मतदार असणारा पक्ष असूनही काँग्रेसला केवळ 44 जागा मिळाल्या. भाजपाकडे 105 आमदार होते. मात्र सगळ्यात मोठा पक्ष असूनही तो विरोधात बसला, ही देखील क्वचितच बघायला मिळणारी बाब त्यावेळी दिसून आली. पुढे कोरोनामुळे हे सरकार नीट चालू शकले नाही. जवळपास दीड वर्ष त्यातच गेले. त्या काळी विधानसभेचे कोणतेही अधिवेशन आठवड्यापेक्षा अधिक काळ चालले नाही. स्वाभाविकच राजकारणात एक खदखद जाणवत होती. परिणामी हे सरकार गडगडले. उद्धव ठाकरेंच्या कार्यकाळात पोलीस अधिकारी सचिन वाझे यांनी उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या घराखाली कथित बॉंब ठेवण्याचे धाडस केल्याची घटना गाजली. तिने धक्कादायक वा भूकंप घडवून आणणाऱ्या घटनांच्या मालिकेत भर घातली. पुढे गाडीचा मालक मृतावस्थेत आढळला आणि प्रकरण चिघळले. हा खटला अद्यापही सुरू झालेला नाही. दीड-दोन वर्षांनंतर अनिल देशमुख तुरुंगाबाहेर आले. दरम्यान, नबाब मलिक अडचणीत आल्याचे आपण पाहिले. त्यापाठोपाठ संजय राठोड अडचणीत आले. थोडक्यात, उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळातील बरेच मंत्री अडचणीत येत होते आणि भाजपाला मोठा फायदा मिळत होता. सरकारकडे नसणारी माहिती आधी फडणवीसांकडे येत होती. त्यामुळे सरकार अस्थिर अवस्थेत होते. नंतरच्या राज्यसभेच्या निवडणुकीतही शिवसेनेला मोठा फटका बसला आणि पुढील दहाच दिवसांत झालेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीनंतर सरकार कोसळले. त्यानंतर जूनच्या अखेरीस एकनाथ शिंदेंचे सरकार आले पण ते वैध की अवैध यावर प्रश्नचिन्ह होते. हे प्रकरण सुप्रीम कोर्टात जाऊनही कोणताही निकाल लागलेला नाही. 2023 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस फुटली आणि पक्षाचा मोठा घटक अजित पवारांच्या नेतृत्वाखाली बाहेर येऊन महायुती सरकारमध्ये सामील झाला. वेगवान प्रशासनाची चुणूक दाखवताना महायुती सरकारने अनेक महत्वाचे निर्णय घेतले. थांबलेली प्रकरणे, अडलेले प्रकल्प मार्गी लागले. असे असले तरी या सरकारला शेतकरी वर्गाची नाराजी दूर करता आली नाही. मराठा समाज आरक्षणाच्या मुद्द्यावरून आक्रमक झाला. मनोज जरांगेंच्या आंदोलनाने या प्रश्नाला मोठी गती आणि वेगळा आयाम दिला. मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण मिळू शकते, कुणबी असल्यामुळे त्यांना कुणबी दाखले द्या, ही मोठे सामाजिक अभिसरण घडवून आणणारी मागणी त्यांनी केली. या घुसळणीतून अमृत न निघता जातीयवादाचे विष मात्र निघाले. सरकारने हे आंदोलन शांत करण्याचे प्रयत्न केले आणि जरांगेंना मर्यादेपलीकडे जाऊन आश्वासने दिली. ती पूर्ण करणे शक्य नव्हते. पण लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी त्यांना शांत करण्याचा प्रयत्न साध्य केला गेला. 2024 च्या लोकसभा निकालामध्ये या सगळ्यांचा मोठा फटका भाजपा आणि मित्रपक्षांना बसला. या सगळ्या स्फोटक पार्श्वभूमीवर येऊ घातलेली निवडणूकही अतिशय गुंतागुतीची आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. महाराष्ट्राचे दोन मोठे पक्ष फुटले आहेत. आधी शिवसेनेची 16-17 टक्के आणि राष्ट्रवादीचीही मतांची टक्केवारी साधारण तेवढीच होती. शरद पवारांनाही महाराष्ट्रात कधीही 60 पेक्षा जास्त जागा मिळाल्या नाहीत, तर शिवसेनेला 70 जागांपुढे जाता आलेले नाही. म्हणजेच 100 पेक्षा जास्त जागा न मिळाल्याने कधीही स्वबळावर त्यांचे सरकार आलेले नाही. आज भाजपाची स्वत:ची मतेही फार कमी झालेली नाहीत. मात्र शरद पवार, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना या निवडणुकीत मोठा फटका बसणार आहे. लोकसभेला ठाकरे आणि शरद पवारांना एकमेकांची मदत झाली. दोघांकडील पेटून उठलेल्या कार्यकर्त्यांनी चांगला हात दिला. पण तशी मदत विधानसभेला मिळणार नाही, कारण ही लढत 288 मतदारसंघांमध्ये होत आहे. त्यामुळेच 48 मतदारसघांमध्ये एकत्र आलेली ताकद विखुरलेली दिसेल. विधानसभा निवडणुकांच्या परिप्रेक्ष्यातून लोकसभेच्या निकालाचे विश्लेषण केले तर काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष दिसतो. त्यानंतर भाजपाची वर्णी आहे. पण शरद पवार आणि ठाकरेंची परिस्थिती तशी नाही. त्यामुळेच शिवसेनेच्या दोन्ही गटांचा 50-60 जागांवरच प्रभाव राहील, असे वाटते. थोडक्यात, हा ठाकरे आणि शिंदे या दोन्ही गटांना फटका आहे. त्याचप्रमाणे अजित पवार आणि शरद पवारांनाही फटका बसेल. हे दोन्ही गट एकमेकांची मते खाऊनच मागे पडण्याची चिन्हे आहेत. मतदारसंघामध्ये प्रथम क्रमांक मिळवणाऱ्यांनी तेथे लढायचे असे गणित वा मांडणी महायुतीमध्ये असल्यामुळे भाजपाला जास्त मतदारसंघ लढता येतील. साहजिकच तेवढ्या जागा अन्य दोन पक्षांना मिळणार नाहीत. लोकसभा निवडणुकांमध्ये दोन्ही मोठ्या आघाड्यांना मिळालेल्या मतांमध्ये अवघ्या अर्ध्या टक्क्याचा फरक आहे. महायुतीला तेवढीच मते वाढवावी लागतील. लाडकी बहीण योजनेचे सहा हप्ते दिल्यानंतर महिला मतदारांचा झुकता कल हा फरक भरुन काढू शकेल. खेरीज सोयाबीन, तांदूळ, धान आदी पिकांचे राहिलेले पैसेही दिले गेले आहेत. त्याचबरोबर अडकलेल्या मोठ्या योजनाही महायुतीतर्फे मार्गी लावल्या गेल्या आहेत. पुण्यामध्ये मेट्रो जाळे विस्तारणे, मुंबईत मेट्रोच्या ॲक्वा लाईनचा एक टप्पा, कोस्टल रोडचा एक भाग, अटल सेतू सुरु होणे, सामान्यजनांसाठी टोल हटवले जाणे हे याचे उदाहरण म्हणावे लागेल. अगदी आचारसंहिता लागू होण्याच्या काही तास आधी महायुतीने मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर केला. थोडक्यात, लोकांच्या हाती पैसे, सेवा पुरवून खूश करण्याचा प्रयत्न महाआघाडीने केला आहे. सात आमदारांची नेमणूक ही आणखी एक महत्त्वपूर्ण घटना म्हणावी लागेल. लाडकी बहीण योजनेमध्ये एकेका विधानसभा मतदारसंघात एक लाखांपेक्षा अधिक महिला समाविष्ट केल्या गेल्या आहेत. त्यातील निम्म्या मतदार महिलांनी पूर्वीचे मतदान बदलून मते फिरवली तरीदेखील मोठा फरक पडेल आणि अडचणीत असणारे मतदारसंघ सूकर होतील असे काही विद्यमान तर काही विरोधी पक्षातील आमदार सांगत आहेत.

## थोडक्यात

### आर्वीच्या विकासासाठी कटिबद्ध राहीन : आ. भीमराव तापकीर



**खडकवासला (आरंभ पर्व) :** खडकवासला विधानसभा मतदारसंघात निवडणुकीचे वारे जोरात वाहत आहे. तिरंगी होणाऱ्या या निवडणुकीकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. चौथ्यांदा निवडणूक लढवणारे भाजप महायुतीचे उमेदवार विद्यमान आ. भीमराव तापकीर हे ही निवडणुकीसाठी सज्ज झाले आहेत.त्यांनीही गावभेट दौरा सुरु केला आहे. आ. तापकीर यांनी आर्वीतील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात काकडा आरती करत दर्शन घेतले. उपस्थित नागरिकांना आणि भाविकांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. परिसरातील नागरिकांशी त्यांनी संवाद साधला. आर्वीच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे .आजवर कामे केली परंतु इथून पुढेही विकास कामे राबवूया. ह्या निवडणुकीत मोठ्या मताधिक्यानी जिंकून देण्यासाठी मतदानरुपी आशीर्वाद मला द्यावे असे आवाहन आ. भीमराव तापकीर यांनी उपस्थित ग्रामस्थांना केले. यावेळी माजी सरपंच आण्णा बांडे, माजी पंचायत समिती सदस्य अनिरुद्ध यादव,राजू दिघे,संतोष चोरघे, युवा मोर्चा अध्यक्ष ओंकार बांडे, किरण गोगावले, प्र.अध्यक्ष महेश भोसले व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शाही अभ्यंगस्नान, फराळ, फटाके फोडत रस्त्यावरील मुलांची दिवाळी झाली गोड

- आबा बागुल यांचा १७ वर्षांचा अखंड अभिनव उपक्रम



**पुणे (दै. आरंभ पर्व)** रस्त्यावरील व सिग्नल वरील गरीब मुलांना दिवाळी सणाचा आनंद देणारा व त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा आनंद सोहळा सारसबाग येथे पार पडला. आयोजक आबा बागुल यांच्या सतरा वर्षांच्या अखंड उपक्रमाला याही वर्षी प्रारंभ झाला.

बागुल यांच्या संकल्पनेतून शाही अभ्यंगस्नान, फराळ, फटाक्यांची आतिषबाजी आणि नवीन कपडे यामुळे उपस्थित मुले अक्षरशः नाचू लागली. पर्वती विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार श्री आबा बागुल यांनी केवळ निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन हा उपक्रम राबविला नसून, गेली 17 वर्षे तो सातत्याने राबवित आहेत. ज्यांना दोन वेळचे अन्य वेळेवर मिळत नाही, त्यांना दिवाळीत स्वतःच्या हाताने शाही अभ्यंगस्नान घालून नवीन कपडे देऊन व दिवाळीचा फराळ देत त्यांची दिवाळी बागुल यांनी गोड केली. यामुळे बागुल यांच्या उपक्रमाबद्दल पुणेकर नागरिक कौतुक व्यक्त करत आहेत. सारसबाग येथील अण्णाभाऊ साठे पुतळ्याजवळ नरक चतुर्थीचा सोहळा पार पडला. उटणे, मोती साबण याने नाहून ही मुले आबांच्या जवळ अभिमानाने पाहत होती. यावेळी त्यांना मिठाई देऊन त्यांना फटाके देण्यात आले. या फटाक्यांच्या आतिषबाजीत स्वतः आबा सहभागी होऊन त्यांचा आनंद द्विगुणीत करीत होते. यावेळी या गरीब मुलांचे पालकही भारावून गेले. यावेळी जयश्री बागुल, विश्वास दिघे, संतोष गिले, साई कसबे, गोरख मरळ, मनीषा गायकवाड, , हर्षदा बागुल, इम्तियाज तांबोळी, अशोक नेटके, जयकुमार ठोंबरे, अमित बागुल आदी उपस्थित होते..

**बालगोपाळांचा आनंद हा आशीर्वाद: बागुल**

गेली सतरा वर्षांपासून गोरगरिबांच्या मुलांसाठी दिवाळी करण्याचा प्रयत्न करतोय. ह्यात त्यांच्या आनंदातून मला आशीर्वाद नक्की मिळतोय. सणांचा आनंद आपण घेतला



## "सचिन भाऊंना आमदार करायचंय" *महिलांचा एल्गार*

**पुणे (दै. आरंभ पर्व)** खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रतिष्ठेची लढाई होत आहे. अशात मोकाटेनगर येथे मोठ्या थाटात महिला वर्गाचा हळदी कुंकू समारंभ पार पडला.

विधानसभेच्या दृष्टीने इथे चर्चा ही झाली. पाणी टंचाई, अनेक समस्यावर सचिनभाऊ दोडके हेच मार्ग काढतील त्यांना आमदार करायचय असा निर्धार महिलानी केला आहे. यावेळी उपस्थित सर्व महिलांनी 'रामकृष्ण हरी वाजवा तुतारी'चा जयघोष केला. तसेच मा. शरदचंद्र पवार आणि सचिन दोडके यांच्या आम्ही पाठीशी असल्याचे मत यावेळी महिलानी व्यक्त केले.

खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये अनेक भागांमध्ये महिलांना स्वच्छतागृहे नाहीत ,बस स्टॉप ही नाहीत. यामुळे महिला वर्गांना गैरसोयीला सामोरे जावे लागते. याकडे आतापर्यंत डोळेझाकच करण्यात आली आहे. यामुळे परिवर्तन करण्याचा निर्धार ह्या महिलांनी व्यक्त केला आहे.

## महविकास आघाडी मुख्य निवडणूक कचेरीचे उद्धाटन आणि कार्यकर्ता मेळावा संपन्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)** पर्वती विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष - कांग्रेस - शिवसेना आणि मित्र पक्ष महाविकास आघाडी उमेदवार सौ.अश्विनी नितीन कदम यांच्या पर्वतीतील निवडणूक कचेरीचे उद्घाटन आणि महाविकास कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला. यावेळी मुख्य कचेरीचे उद्घाटन काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार प्रभारी अध्यक्ष अंकुश काकडे, शिवसेना शहर प्रमुख गजानन थरकुडे, आरपीआय खरात गटाचे अध्यक्ष राजाराम कांबळे, आपचे उपाध्यक्ष कुमार घोंगडे आदी प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी माजी आमदार अनंतराव गाडगीळ, काँग्रेस नेते अभय छाजेड, माजी नगरसेवक अण्णा माळवतकर, अजित दरेकर, बाळासाहेब ओसवाल अशोक हरणावळ, बंडू नलावडे, राहुल तुपेरे, राष्ट्रवादी ॲड सेलचे भगवानराव साळुंखे, पंडितराव साबळे, नरेंद्र व्यवहारे, सुनील जगताप, किशोर कांबळे, स्वाती पोकळे, मृणालिनी वाणी आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. महाविकास आघाडी आणि मित्र पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी यावेळी निवडणुकीतील वाढता प्रचार आणि जनतेची असलेली अपेक्षा पाहता, यंदाची निवडणूक चुरशीची होणार असल्याचे स्पष्ट करत निवडणुकीतील विजयी रणनीती आणि एकजुटी संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक काँग्रेस अध्यक्ष शशिकांत तापकीर यांनी केले. महाविकास आघाडी आणि इंडिया फ्रंट पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पर्वतीत परिवर्तन होणार : अश्विनी कदम

मी जन्माने आणि कर्माने पर्वतीकर आहे. पर्वतीकरांचे प्रश्न, त्यांचे मूलभूत हक्क अधिकार, समस्यांची जाण आणि शिक्षिकेचा धर्म असल्याने नगरसेवक या नात्याने माझ्या परिसराचा कायापालट करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. पंधरा वर्षात 15 ही कामे नागरीकांना दाखवता येतील असे विद्यमान लोकप्रतिनिधीना करता आले नाहीत. कोरोनासाररव्या महामारीत कुटुंब संकटात असताना घरात न बसता कार्यकर्त्यांच्या साथीने आणि मदतीने नागरिकांसाठी अहोरात्र धावून गेले. मागील निवडणुकीत पराभव झाला तरीही माझ्या पर्वती विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी अखंडपणे कार्यरत आहे. मधल्या काळात अनेक राजकीय घडामोडी घडल्या. आम्हालाही मोठ्या प्रमाणात अमिष दाखवण्याचा प्रयत्न केला. परंतु निष्ठेला महत्त्व असल्याने पितृतुल्य पवार साहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्यामुळेच पक्षाने पुन्हा निवडणूक लढवण्याची संधी यावेळी शिवसेना सोबत असल्याने महाविकास आघाडी आणि मित्र पक्षाची एकजूट आणि पर्वती विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या साथीने इतिहास घडणार परिवर्तन होणार.

- सौ .अश्विनी नितीन कदम, उमेदवार

# राऊत पिता पुत्रांच्या गावभेटीने विधानसभेचा प्रचाराचा टप्पा पूर्ण

**बार्शी (दै. आरंभ पर्व)** बार्शी विधानसभा मतदारसंघातील घडामोडीवर संपूर्ण राज्याचे लक्ष आहे. आमदार राजाभाऊ राऊत यांच्या अनपेक्षित शिवसेना प्रवेशानंतर तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये एक वेगळी ऊर्जा संचारल्याचे चित्र दिसत आहे. तत्पूर्वी आमदार राजाभाऊ राऊत यांनी तालुक्यातील गावभेटी देऊन विधानसभेच्या दृष्टीने उजळणी सुरू केली आहे. त्याशिवाय त्यांचे पुत्र बाजार समितीचे माजी सभापती ॲड. रणवीर राऊत यांनीही गावभेटी देऊन कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम सुरू केले आहे. दोन्ही पिता पुत्रांना चांगला प्रतिसाद मिळतोय. यावरून ही





विधानसभा निवडणूक रंगतदार होणार आहे हे स्पष्ट दिसते. "खिचके तान धनुष्यबाण" म्हणत कार्यकर्त्यांमध्ये सोशल मीडियामध्ये जोरदार प्रचार मोहीम सुरू आहे. तालुक्याच्या विकासाच्या राजकारणावर निवडणूक लढवणार असल्याचे संकेत आ. राजाभाऊ राऊत यांच्याकडून मिळाले आहेत. गेली अडीच वर्षांमध्ये हजारो कोटींची विकास कामे हा राऊत यांनी लोकप्रतिनिधी या नात्याने बार्शी तालुक्यातील सर्वात मोठा माईल स्टोन गाठला आहे. आतापर्यंत एकाही आमदारांना एवढा आलेला नाही हे त्रिवार सत्य आहे. अनेक गावात एक एक कोटीची रुपये निधीतून विकास कामे सुरू आहेत. कमी कालावधीमध्ये तालुक्याला विकासाची झळाळी देण्याचे काम आ.राऊत करत आहेत.

त्यामुळे ते विधानसभेच्या निकालाबाबतीत निश्चिंत आहेत. समोर माजी मंत्री दिलीप सोपल यांचे कडवे आव्हान आहे. मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाच्या वतीने उमेदवार देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तरीही मजबूत कार्यकर्त्यांच्या फळीच्या जोरावर त्यांनी सर्व सत्ताकेंद्रे हस्तगत केली आहे. ती परंपरा चालू राहील व आमदार राऊत विधानसभेत जातील हा कार्यकर्त्यांना विश्वास वाटतोय.

त्यामुळे लोकसभेतील मरगळ झटकुन कार्यकर्ते ही फ्रेश होऊन विधानसभेसाठी सज्ज झाल्याचे चित्र दिसत आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये झालेल्या काही चुका दुरुस्त करत राऊत यांच्याबरोबर कार्यकर्ते व शिवसैनिकही जागा आपल्याकडे कायम राखण्याकरता प्रयत्न करत आहेत. दुसरीकडे वैरागचे मोठे नेते असलेले निरंजन भुमकर यांनी पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतलाय.

परंतु भाऊंचे जुने सहकारी असलेले अनिल डिसले पुन्हा राऊत गटामध्ये सक्रिय होत असल्याचे दिसत आहे. यामुळे आगामी काळामध्ये तालुक्यातील राजकारण ढवळून निघणार आहे. आ.राऊत शेवटच्या क्षणी कोणता मास्टर स्ट्रोक खेळतात यावर निवडणुकीचा निकाल अवलंबून आहे.

## थोडक्यात



### यश बिचकर याची भारतीय नौसेनेत निवड

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) विभागातील विद्यार्थी यश राजेंद्र बिचकर याची भारतीय नौसेना विभागात वर्ग 2 अधिकारी पदावर निवड झाली. या यशाबद्दल खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी कु. यश व त्याच्या पालकांचे अभिनंदन केले. संस्थेच्या वतीने त्यांचा सहकुटुंब सत्कार केला. या वेळी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी यशची निवड महाविद्यालयासाठी अभिमानास्पद असून विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी आहे असे सांगून यशने देशसेवेच्या माध्यमातून आपले पालक, गाव, महाविद्यालय आणि तालुक्याचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी एन.सी.सी. विभागप्रमुख डॉ. योगेश वाळुंज यांनी उपस्थितांचे आभार मानले.




### 'जॉय ऑफ गिविंग विक'कडून आश्रम शाळेला मदत

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** आपल्या सभोवतालच्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. याच समाजातील गरीब घटकांसाठी आपल्याच आनंदातील काही क्षण त्यांच्यासाठी देणाऱ्या भावनेतून असे मत पवार पब्लिक स्कूल हिंजवडीच्या प्राचार्य दीपा शानबाग यांनी व्यक्त केले. दिपावली निमित्त मातोश्री रमाई आंबेडकर प्राथमिक व माध्यमिक निवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पवार पब्लिक स्कूल हिंजवडीच्या प्राचार्य दीपा शानबाग व विभाग प्रमुख सुनंदा अजित यांच्या मार्गदर्शनाखाली 'जॉय ऑफ गिविंग विक' हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये पवार पब्लिक स्कूल मधील विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले होते की ज्या काही जीवनावश्यक वस्तू व किराणा सामान समाजातील गरजू व गरीब विद्यार्थ्यांना द्यावे याला मोठ्या प्रतिसाद म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांनी गहू, तांदूळ, साखर, डाळी तसेच बिस्किटे दिली आणि हे सर्व साहित्य गरजूंना मदत केली पाहिजे असा विचार त्यांनी केला आणि ते सर्व साहित्य आज दिवाळी चे औचित्य साधून मातोश्री रमाई आंबेडकर प्राथमिक व माध्यमिक निवासी आश्रम शाळेत सर्व विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी आंतरराष्ट्रीय खेळाडू धनंजय मदने, पवार पब्लिक स्कूलच्या क्रीडा शिक्षिका मनिषा मदने, शाळेचे संस्थापक कादर शेख, मुख्याध्यापक शबाना शेख मॅडम, अमोल शिंदे सर, प्रवीण कांबळे, दिपाली करंडे, अनिता शिंदे, आवेझ शेख तसेच शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक श्री गुरुदत्त सेवा विकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुनिल तुपे यांनी केले. सूत्रसंचालन प्रविण कांबळे यांनी केले तर आभार अमोल भोसले यांनी मानले.

*सूर्यदत्त इन्स्टिट्यूट्स ऑफ मॅनेजमेंटचे विद्यार्थी थायलंडमधील*

### एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या अभ्यास दौऱ्यावर

**पुणे (आरंभ पर्व) :** वैश्विक शैक्षणिक समरसता कार्यक्रमांतर्गत सूर्यदत्त इन्स्टिट्यूट्स ऑफ मॅनेजमेंटचे विद्यार्थी व शिक्षक यांचा एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीला 18 ते 26 ऑक्टोबर 2024 या कालावधीत 9 दिवसांचा अभ्यास दौरा आयोजिला आहे. ही टीम नुकतीच थायलंडला पोहोचली. वैश्विक समरसता कार्यक्रमात एआयटीमध्ये चार दिवसांचा दौरा असून, येथे एआयटीमधील तज्ज्ञ प्राध्यापकांची अभ्यागत व्याख्याने, कॅम्पस सहल, नेटवर्किंग, रॉबर्ट बॉश, सियाम सिमेंट ग्रुप अशा उद्योगांना भेटी असतील. दोन दिवस पटाया येथे सांस्कृतिक कार्यक्रमांची देवाणघेवाण होईल. त्यानंतर बुद्ध मंदिराचे दर्शन व फ्लोटिंग मार्केटला भेट होणार आहे, अशी माहिती सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया दिली. परस्पर शैक्षणिक सहकार्य आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सने अलीकडेच एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी संस्थेसोबत सामंजस्य करार केलेला आहे. विद्यार्थी आणि प्राध्यापकांची देवाणघेवाण, क्षमता संवर्धन आणि इतर परस्पर फायद्याच्या उपक्रमांना चालना देण्याचा या सामंजस्य कराराचा उद्देश आहे. त्याअंतर्गत हा अभ्यास दौरा होत आहे. या वैश्विक समरसता कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना बँकॉक या व्हायब्रँट शहरात शैक्षणिक समरसता, औद्योगिक अनुभव आणि सांस्कृतिक समृद्धी यांचे एक अद्वितीय मिश्रण अनुभवता येणार आहे. यातून त्यांना एक सर्वसमावेशक, समृद्ध आणि परिवर्तनशील शैक्षणिक अनुभव मिळणार असून, सांस्कृतिक समरसता आणि करिअर वाढीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांना भविष्यात शाश्वत करिअर घडविण्याची संधी देणारा हा कार्यक्रम ठरणार आहे. यातून विद्यार्थ्यांना जागतिक व्यवसायाच्या वेगाने बदलणाऱ्या क्षेत्रात प्रगतीसाठी आवश्यक कौशल्ये आणि अंतर्दृष्टी मिळेल, असा विश्वास असल्याचे प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी नमूद केले.

# श्रीराम प्रॉपर्टीजचा संयुक्त विकास करारावर स्वाक्षरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दक्षिण भारतातील अग्रगण्य निवासी बांधकाम व्यावसायिक असलेल्या श्रीराम प्रॉपर्टीज लिमिटेडने (एसपीएल) पुण्यात उगवत्या मायक्रो मार्केट असलेल्या उंड्री येथे 6 एकर प्राईम भूखंडासाठी संयुक्त विकास करारावर स्वाक्षरी केली आहे.

कंपनी संमिश्र वापरासाठी विकासाची योजना आखत असून यात 650 पेक्षा अधिक अपार्टमेंट्स आणि काही रिटेल/व्यावसायिक जागा असणार आहे. याचे एकंदर विक्रीयोग्य क्षेत्रफळ 1.0 एमएसएफ (दशलक्ष चौरस फूट) असून त्याचा पुढील चार वर्षांत विकास करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची एकंदर महसूलाची क्षमता ₹ 700 - ₹ 750 कोटी रुपयांची आहे. हा प्रकल्प आर्थिक वर्ष 2025 च्या उत्तरार्धात सादर करण्याचे कंपनीचे लक्ष्य आहे. पुण्यातील या उगवत्या मायक्रो मार्केटमध्ये ओळख ठरणारा निवासी प्रकल्प साकार करण्याची एसपीएलची योजना आहे. या प्रकल्पातून आयटी/आयटीईएस जागा, रिटेल, प्रमुख शिक्षण संस्था आणि शहराच्या मध्यवर्ती स्थळांपर्यंत सुलभपणे पोचता येईल.

या प्रकल्पामध्ये अतिरिक्त 8 एकरच्या विकासाचाही पर्याय आहे, तो मुख्यतः रिटेल आणि व्यावसायिक असेल. या अतिरिक्त जागेसाठी विकासाचे अधिकार मिळविण्याच्या अंतिम टप्प्यात एसपीएल आहे, ही प्रक्रिया लवकरच पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

एसपीएलने आता पुण्याच्या बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे, कारण ही दुसरी सर्वात मोठी निवासी बाजारपेठ असून अलिकडच्या वर्षांत तिची जोरदार वाढ झाली आहे. पुणे हे प्रामुख्याने मिड-मार्केट केंद्रित असून येथील एसपीएलच्या बंगळुरु आणि चेन्नई या मुख्य बाजारपेठांसारख्या ग्राहकवर्गाचा येथे लाभ मिळतो. वैविध्यपूर्ण आणि उत्साही आर्थिक घडामोडी आणि वाढत्या पायाभूत गुंतवणुकीचीही त्याला मदत मिळते.

Shriram Properties
Homes that live in you

या प्रकल्पाचे संपादन म्हणजे पुढील काही वर्षांमध्ये लाईट ॲसेट वेगवान वाढ साधण्याच्या एसपीएल च्या प्रयत्नांचा अविभाज्य भाग आहे. हा प्रकल्प तिच्या प्रकल्पांच्या सबळ ठेव्याला आणखी मजबूत करेल तसेच पुढील दिशेने गतीला मदत करेल. एसपीएलकडे ३० जून २०२४ पर्यंत ४२ एमएसएफचे विक्रीयोग्य क्षेत्रावरील ४२ प्रकल्पांचा मजबूत साठा आहे. त्यात २४.३ एमएसएफ विक्रीयोग्य क्षेत्रफळाचे २६ चालू प्रकल्प आहेत. चालू असलेल्या प्रकल्पांपैकी जवळपास ७५ टक्के आधीच विकले गेले आहेत आणि कंपनीकडे पूर्ण झालेल्या प्रकल्पांची 'शून्य इन्व्हेंटरी ' आहे. या घडामोडीबाबत भाष्य करताना, एसपीएलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री मुरली मलयप्पन म्हणाले, ही गुंतवणूक वेगवान वाढीसाठी आमच्या ॲसेट लाईट धोरणाशी सुसंगत आहे. पुणे ही आशादायक बाजारपेठ आहे आणि आम्हाला श्रीरामसारख्या मोठ्या, प्रस्थापित ब्रँडच्या दृष्टीने लक्षणीय क्षमता दिसते. आयटी/आयटीईएसशी असलेल्या सान्निध्यामुळे, उंड्री हे अलिकडच्या वर्षांत लक्षणीय मागणी असलेले महत्त्वाचे मायक्रो मार्केट म्हणून उदयास आले आहे. या तिमाहीत प्रकल्पाचा शुभारंभ होण्याची आम्ही वाट पाहत असून झपाट्याने उच्च पातळीवरचा दर्जा पुरवून आमच्या ग्राहकांना कमाल पातळीचे हमखास समाधान देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

# मनाच्या आजाराची लक्षणे जाणून घ्यायला हवीत : डॉ. विद्याधर बोरकर


**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"मन म्हणजे मेंदूच्या क्षमतेचा आपली वर्तणूक, आकलन, स्मरणशक्ती, भावना यांच्यावर असलेला प्रभाव होय. मेंदू हा शरीराचाच भाग असल्याने मनोविकारांची लक्षणे आपल्या वर्तणुकीतल्या बदलांनी किंवा अन्य शारिरीक व्यथांद्वारे प्रकट होतात. रक्तदाब, छातीतली धडधड, निद्रानाश अशी ही लक्षणे असू शकतात. ही लक्षणे मानसिक आजारांमुळेच दिसत आहेत का, हे तज्ञांकडून तपासून घ्यावे लागते. मानसोपचार तज्ज्ञांकडून उपचार घेण्यात कसलाही कमीपणा मानू नये. किंवा संकोच करू नये. मनाच्या आजारांचे गांभीर्य लक्षात घेऊन वेळीच उपचार घेणे महत्वाचे असते," असे मत विज्ञान अभ्यासक व आघारकर संशोधन संस्थेतील निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. विद्याधर बोरकर यांनी व्यक्त केले.

मराठी विज्ञान परिषद व भावार्थ यांच्या वतीने जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त 'मनाच्या कथा आणि व्यथा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कर्वे रस्त्यावरील भावार्थच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात मनोवैज्ञानिक भूषण सुकेशिनी वामनराव, आणि मराठी विज्ञान परिषदेचे उपाध्यक्ष विनय र. र. आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. बोरकर यांनी मानसिक स्वास्थ्यावरील आपल्या 'त्या बुधवारी' या कथेचे अभिवाचन केले. भूषण यांनी मनोविकारापासून दूर राहण्यासाठी कोणती काळजी घ्यावी? यावर भाष्य केले.
















Jadhavar®
The Symbol of Success (Since 2014)

*"Education for Strength, Intellect & Wisdom"*
- Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar

# JADHAVAR GROUP OF INSTITUTES

The foundation provides quality education in the fields of Law, Management, Arts, Commerce, Science, Computer Science Nursing, Junior College, International Schools, Open University Center, Schools & School of Education.
**Jadhavar Group of Institute's** operates under the expert guidance of Educationist **Dr. Sudhakarrao Jadhavar**.
The group has one clear mission to deliver quality education to the upcoming generations.

**15000+ STUDENTS** | **600+ STAFF** | **40+ SCHOOLS / COLLEGES** | **100%(*) PLACEMENT ASSISTANCE**

## LAW
LL.B. / B.A. LL.B.
3 Year / 5 Year
Phone - 9823872816

## MANAGEMENT
M.B.A. / P.G.D.M
Phone - 9823872816
www.adityainstitute.co.in

## NURSING
A.N.M / G.N.M.
Phone - 8459727432
www.jadhavarfoundations.org

## SR. COLLEGE
BCA / BBA (Computer Application)
B.Sc. (Computer Science)
B.Sc. (Plane)
B.Sc. (Cyber & Digital Science)
M.Sc. (Computer Application)
M.Sc. (Computer Science)*
BBA / B.Com / M.Com
B.A. / M.A.
Phone - 9168274116
www.jadhavarcollegeedu.com

## EDUCATION
B.Ed
Phone - 8975054114
www.jgefs.org

## PARAMEDICAL
D.M.L.T. / C.M.L.T.
Phone - 8459727432
www.sjcp.in/

## YCMOU
B.A. / B.Com. / D.S.M.
M.A. / M.Com.
Phone - 8459763113

## JR. COLLEGE
11th & 12th
Arts Commerce Science
Phone - 9699707324
www.jadhavarjrcollege.com

## SCHOOL
Play Group to 10th SSC Board Eng. Med. / Semi Eng.
Phone - 7888274117 www.paradiseems.co.in
www.jadhavarems.in / www.jadhavarsemienglish.in

## INTERNATIONAL SCHOOL
Play Group to 12th* C.B.S.E. Board
Phone - 8459781648
www.jadhavarcbse.co.in



Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar
Educational Campus (1), Narhe, Pune - 41



Adv. Shardulrao Sudhakarrao Jadhavar
Educational Campus (2), Narhe, Pune - 41

Surekhatai Sudhakarrao Jadhavar
Educational Campus (3),
Vadgaon Bk, Pune-41.

Surekha Institute of Nursing
Educational Campus (4),
Terkheda, Tal. Washi, Dist. Dharashiv - 25.

Lt. Uddhavrao Tulshiram Jadhavar
Educational Campus (5),
Dhayari - 41.

Apply Online on
jadhavargroupofinstitute.in

**Have a chance to WIN the Scholarship!**

**Founder President**



The **Jadhavar Group of Institutes**
is offering Scholarship to the ward of professionals from Indian Army, Police Force, Fire Brigade, Journalists and Ambulance Driver, providing up to a 50% concession in educational fees for all grades from KG to PG level.
This Scholarship is offered across all branches of JGIs upon completion of Nine years service to society in education.

For more details, please contact
**9075344276**

महाराष्ट्र पोलीस
पुणे पोलीस
press

**Vice President**



Connect with us on Social Media
**#JadhavarGroupOfInstitutes**

### Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar
M.Com., M.A., L.L.M., M.P.M., D.T.L., D.L.L., & L.W., G.D.C. & A., Ph.D.
President : All India Principal Federation
Ex. Member : Management Council, Savitribai Phule Pune University, Pune.
Secretary General : Maharashtra State Principal Federation
General Secretary : Principal Forum (Savitribai Phule Pune University), Pune.

### Adv. Shardulrao Sudhakarrao Jadhavar
M.B.A., P.G.D.H.R.M., M.Com., D.H.R. & L., D.C.L., D.C.P.L., APCL., CMED., D.L.L. & L.W., L.L.M.
VICE PRESIDENT : Jadhavar Group of Institutes
• Jadhavar Hotel and Developer Pvt. Ltd. • Jadhavar Films
• Jadhavar Real Estates • Shardulrao Sudhakarrao Jadhavar Associates
• Prin. Dr. Sudhakarrao Jadhavar Sevakanchi Patsanstha

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.